ISSN 2277-8063 (Print)
Special Issue – May 2023
Impact Factor – 8.041

# Navjyot नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal
## Science, Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management

*(A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

IIJIF iiJS Cosmos

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

*- Published by-*
**HOUSA Publication**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22. | History | Patriotic Songs – An Inspiration for Indian Freedom Movement | Dr. Mrs. Madhura Rajesh Karande | 80-83 |
| 23. | समाजशास्त्र | स्वातंत्र्य संग्रामातील स्त्रियांचे योगदान | डॉ. कन्नाडे ममता कार्तिक | 84-87 |
| 24. | इतिहास | कामगार चळवळीतील अण्णाभाऊ साठे यांचे योगदान | डॉ . निकम राजश्री दिलीप | 88-90 |
| 25. | राज्यशास्त्र | लोकमान्य टिळक यांचे स्वातंत्र्याविषयक विचार | डॉ. वंदना अरूण सातपुते | 91-94 |
| 26. | समाजकार्य | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व भटके विमुक्त | डॉ. विजय जयसिंग माने | 95-99 |
| 27. | राज्यशास्त्र | स्वातंत्र्य चळवळ आणि स्वातंत्र्यसैनिक वसंतदादा पाटील | डॉ. सौ. श्रध्दा विनोद कोठावळे | 100-103 |
| 28. | इतिहास | चिंचणे (ता. चंदगड) : गांधी विचार आणि स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव आणि परिणाम | डॉ. सौ. वैशाली अभिजीत सारंग | 104-107 |
| 29. | इतिहास | दलित पँथर : दलित अस्मितेची चळवळ | डॉ. सरवदे संघमित्रा विठ्ठलराव | 108-113 |
| 30. | Economics | A Study on Movement of Working Class People in India | Dr. Santosh Barale | 114-116 |
| 31. | राज्यशास्त्र | आद्यक्रांतीवीर उमाजी नाईकांचा राजकीय स्वातंत्र्यलढा | प्रा. श्रीमती संध्या जयसिंग माने | 117-120 |
| 32. | इतिहास | सविनय कायदेभंग चळवळ आणि महाराष्ट्रातील जंगल सत्याग्रह : एक ऐतिहासिक अभ्यास | प्रा. संदिप भैरू जाधव | 121-125 |
| 33. | मराठी | शांताबाई दाणी यांचे चळवळीतील योगदान | प्रो. डॉ. सिंधू जयवंत आवळे | 126-128 |
| 34. | इतिहास | हुपरी- रेंदाळ परिसरातील स्वातंत्र्य आंदोलन | प्रा. डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले | 129-131 |
| 35. | राज्यशास्त्र | महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीमधील आण्णासाहेब लठ्ठे यांचे योगदान | श्री. तेजस दिलीप कुदळे | 132-134 |
| 36. | राज्यशास्त्र | जयप्रकाश नारायण यांच्या लोकशाही विचारांची समकालीन प्रस्तुतता व मर्यादा | प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ | 135-143 |
| 37. | इतिहास | यशोदर्शन फाउंडेशनचे अवयवदान चळवळीमधील कार्य व महत्व | प्रा. प्रशांत कुचेकर | 144-146 |
| 38. | इतिहास | वसंतराव माने यांचे गोवामुक्ती लढ्यातील योगदान | धैर्यशील मारुती जाधव , डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर | 147-149 |
| 39. | इतिहास | सोलापूरातील भटक्या-विमुक्त जमातीच्या सामाजिक चळवळीचा अभ्यास | प्रियांका मधुकर गायकवाड | 150-153 |
| 40. | राज्यशास्त्र | स्त्रीवादी चळवळ | सौ. प्रियांका विलास झोळे - पाटील | 154-156 |
| 41. | इतिहास | स्वातंत्र्यसैनिक सखाराम दादा पाटील: जीवन व कार्य | प्रियांका राजाराम पाटील | 157-160 |
| 42. | इतिहास | गांधीजींचे अहिंसेविषयक विचार : एक अभ्यास | मनोहर सुभाष निकम | 161-164 |
| 43. | इतिहास | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जातनिर्मूलनविषयक विचार व कार्य | डॉ. रामचंद्र वसंत कुंभार | 165-169 |
| 44. | History | JRD Tata a Visionary Nation Builder | Waghmare Kabirdas Sudam | 170-174 |

# स्वातंत्र्य संग्रामातील स्त्रियांचे योगदान

**डॉ. कन्नाडे ममता कार्तिक,** सहाय्यक प्राध्यापिका, समाजशास्त्र विभाग,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर, swamimamata@gmail.com

---

## प्रस्तावना

स्त्री मुक्त असावी, रूढी किंवा परंपरा हयांच्या सक्तीपायी तिला कुठलाही जाच होऊ नये. ही आजची प्रगत विचारसरणी. पण सनातन धर्मरीती म्हणून किंवा आदर्श समाजरचनेच्या काही असुंतीलत धारणांच्या साठी आज स्त्री काही समाजांत अवांच्छनीय बंधनात सापडलेली जानवते. वेदकाळी स्त्रियांना प्रतिष्ठा होती. धर्मकारण, राजकारण, ज्ञानविज्ञानकारण आणि स्वातंत्र्य संग्राम यामध्ये ती पुरुषाच्या बरोबरीने कार्य केले आहे. प्रत्येक समाजात प्रत्येक क्षेत्रात स्त्रीचे योगदान महत्वपूर्ण असताना आज एकविसाव्या शतकात देखील लिंग विषमता, स्त्री पुरूष भेद, स्त्रियांना निम्न दर्जा यासारख्या समस्यांना स्त्रियांना सामोरे जावे लागत आहे.

## शोध निबंधाचा उद्देश (Objective of Study)

- स्वातंत्र्य संग्रामाचा अभ्यास करणे
- भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील स्त्रियांचे योगदान अभ्यासणे.

## संशोधन पद्धती (Research Methodology)

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विविध ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे या द्वितीयक सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

स्वातंत्र्य ही सहज प्रेरणा आहे आणि तिचे उगमस्थान आपल्या जन्मभूमीवरील प्रेमामध्ये आहे. आपल्याला ज्याप्रमाणे आपल्या आईचा अपमान सहन होत नाही. त्याचप्रमाणे आपल्या जन्मभूमीवर परकीयांची सत्ता आपल्याला सहन होत नाही. भारतावर पूर्वी परकीयांनी स्वाऱ्या केल्या. परंतु लुटालूट आणि कत्तली करून ते परत गेले. मोगल येथे आले आणि ते येथीलच रहिवासी बनून गेले. ब्रिटिशांनी मात्र भारताला पूर्णपणे जिंकून आपली राजकीय व आर्थिक सत्ता प्रस्थापित केली. या आक्रमणामुळे आपण गुलाम झालो आहोत, असे लोकांना कळून आले तेव्हा त्यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, परंतु ते पराभूत झाले. महाराष्ट्रात उमाजी नाईकाने आपल्या भिल्ल अनुयांयांच्या मदतीने आपले स्वतंत्र राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला. परंतु तोही काही काळानंतर अयशस्वी झाला.

डलहौसी या गव्हर्नर जनरलने ज्या वेळी एकामागून एक संस्थाने खालसा केली. त्या वेळी बेळगावजवळील कित्तूर येथील चन्नमा या छोटया संस्थानच्या राणीनेही त्याचा प्रतिकार केला परंतु ब्रिटिशांनी तो मोडून काढला.

स्वातंत्र्याचा पहिला व्यापक उठाव १८५७ मध्ये झाला. हा उठाव अयशस्वी झाल्यामुळे त्याचा उल्लेख बंड असा करण्यात येतो. परंतु ते पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते. या स्वातंत्र्यसंग्रामात ज्यांच्या हातातील राजसत्ता गेली त्यांच्यापैकी नानासाहेब पेशवे, तात्या टोपे आणि बहादुरशहा हे होते. त्याचबरोबर ब्रिटिशांच्या सैन्यात शिपाई म्हणून दाखल झालेले हिंदु-मुसलमान सैनिकही होते. हया पहिल्या स्वातंत्र्यलढयामध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाई हिने अतुल पराक्रम गाजवला. झाशी संस्थान खालसा करू पाहणाऱ्या डलहौसीचा राणी लक्ष्मीबाईने "मेरी झांशी नही दूँगी" असे रोखठोकपणे सांगितले आणि आपल्या सैन्याचे नेतृत्व करीत ती १८५६ च्या स्वातंत्र्यलढयात सामील झाली. भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्रियांच्या पराक्रमाची सुरूवात झाशीची राणी लक्ष्मीबाई आणि कित्तूरची राणी चन्नमा या दोघींनी अतुलनीय त्याग करून केली.

१८५७ च्या स्वातंत्र्य समरात अपयश आल्यानंतर येथील विचारवंत आपण परतंत्र का झालो याचा विचार करू लागले. आपले अज्ञान हे आपल्या पराभवाचे एक प्रमुख कारण असे न्या. रानडे आणि अन्य विचारवंतानी सांगितले आणि समाजाचे प्रबोधन करण्यासाठी त्यांनी विविध मार्गानी कार्य करण्यास सुरूवात केली म. जोतीराव फुले यांनी जातिव्यवस्थेमुळे आपला समाज दुभंगला असल्यामुळे आपण परकीय आक्रमणाचा प्रतिकार करू शकलो नाही असे सांगून बहुजनसमाजात ज्ञानप्रसारास सुरूवात केली. हे प्रयत्न म्हणजे भावी स्वातंत्र्य लढयाची पायाभरणी होती. म. फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी समाजाच्या विरोधास न भिता स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरूवात केली. प्रबोधन कार्यात भाग घेणाऱ्या त्या पहिल्या स्त्री कार्यकर्त्या होत्या. त्यांच्यानंतर पंडिता रमाबाई यांनीही स्त्रियांमध्ये महत्वाचे प्रबोधन कार्य केले. पुण्यामध्ये १८९७ साली जेव्हा प्लेगचा कहर झाला त्यावेळी रॅण्ड या लष्करी आधिकाऱ्याने प्लेगच्या साथीविरूद्ध उपाय योजतांना लोकांवर अनेक तऱ्हेचा जुलूम केला. त्या वेळी स्त्रियांच्या बाजून पंडिता रमाबाई निर्भयपणे उभ्या राहिल्या. त्यांनी स्त्रियांच्या विटंबनेबद्दल सरकारवर टीका केली आणि असे प्रकार थांबले पाहिजेत, अशी जोराची मागणी केली समाजाचे प्रबोधन करताना अन्यायाविरूद्ध काम करणाऱ्या सावित्रीबाई आणि पंडिता रमाबाई यांच्या देशकार्याचा गौरवाने उल्लेख केलाच पाहिजे.

बंगालच्या फाळणीच्या विरोधात ज्या वेळी चळवळ झाली त्या वेळी बंगालमधील स्त्रियांनाही आपला वाटा उचलला होता. स्वामी विवेकानंदाना आणि अरविंद घोषांना साथ देणाऱ्या भगिनी निवेदिता यांचे कार्यही फार महत्वाचे होते.

ॲनी बेझंट या जन्माने भारतीय नव्हत्या. परंतु भारतात आल्यावर त्या येथील जनतेशी एकरूप झाल्या आणि भारताच्या स्वातंत्र्य लढयात देशभर प्रचार केला. होमरूल लीगच्या संस्थापक म्हणून ॲनी बेझंट यांनी केलेले कार्य फार महत्वाचे होते. भारताच्या स्वातंत्र्याची आकांक्षा त्यांनी भाषणांतून व वृत्तपत्रातून समर्थपणे मांडली. याच कालखंडात सरोजिनी नायडू या तरूण कार्यकर्त्या धडाडीने राजकीय कार्य करू लागल्या. त्यांच्या त्या वेळच्या कामाचे कौतुक ना. गोपाळकृष्ण गोखले यांच्यासारख्या थोर नेत्याने केले आणि भारताच्या स्वातंत्र्य लढयात स्त्रियांनी सरोजिनी देवीच्या पावलावर पाऊल टाकावे असे आवाहन केले.

म. गांधीनी देशाच्या राजकारणाची सुत्रे जेव्हा हाती घेतली तेव्हा त्यांनी स्त्री शक्तीचे महत्व ओळखुन स्त्रियांना सुरूवातीस विधायक कार्यात सामील करून घेतले. चरखा हा विधायक चळवळीतील महत्वाचा घटक होता आणि चरखा सुरू करण्याची कल्पना गांधीजीना गुजरातमधील एका महिलेमुळेच सुचली. वस्त्र स्वावलंबनासाठी चरख्यावर सुत कातण्याच्या कार्यक्रमात हजारो महिला सामील झाल्या. म. गांधीनी दिलेल्या दारूबंदी, ग्रामसफाई, सूतकताई आदि विधायक कार्यक्रम हे प्रभावी राजकीय शिक्षण होते. विधायक कार्यात सहभागी झालेल्या महिला राजकीयदृष्टया जागृत झाल्या आणि स्वातंत्र्यलढयात सामील होण्याचा निर्धार त्यांच्यात वाढू लागला.

पुढे १९३० साली म. गांधीनी सत्याग्रह आंदोलनाचे रणशिंग फुंकले आणि देशाच्या सर्व भागातील महिला उत्स्फूर्तपणे या लढयात सामील झाल्या. म. गांधीनी मिठाचा सत्याग्रह करण्याचे जाहीर करून साबरमती आश्रमापासून समुद्रकिनाऱ्यावरील दांडी या गावापर्यंत पदयात्रा काढण्याची ठरविली. या दांडीयात्रेत म. गांधीच्या समवेत जे सत्याग्रही होते त्यांच्यामध्ये सरोजिनी नायडू या प्रमुख होत्या. गांधीजीना अटक झाल्यानंतर सरोजिनी नायडू यांना धारासना येथील मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व केले.

मुंबई व गुजरात येथे महिलांनी प्रभात फेऱ्या काढण्यास सुरूवात केली आणि स्वातंत्र्य लढयाचा संदेश घराघरातून पोहोचविला. "चरखा चला चलाके लेंगे स्वराज्य लेंगे" हे प्रभातफेरीचे गाणे देशभर केले. तरूण मुली आणि प्रौढ स्त्रिया, नही रखना नही रखना ये जुल्मी सरकार नही रखना असे गाण्यांतून म्हणून साम्राज्यसत्तेला आव्हान देत होत्या. गांधीजीच्या आदेशाप्रमाणे स्त्रियांनी देशभर दारूच्या दुकानांवर निरोधन केले. मुंबईमध्ये अवंतिकाबाई गोखले व त्यांच्या सहकारी महिला सत्याग्रह करून तुरूंगात गेल्या. मुंबईला बोरीबंदराजवळील आझाद मैदानावर स्त्रियांच्या मिरवणुकीवर पोलिसांनी अमानुष लाठीहल्ला केला; परंतु स्त्री सत्याग्रहींनी हातातील

तिरंगा ध्वज सोडला नाही. लाठीचे तडाखे खाताना "भारतमाता की जय" म्हणणाऱ्या स्त्रियांचे देशभर कौतुक झाले. आझाद मैदानावरील या लाठीहल्ल्यावर एक गाणे रचले गेले. हयातील दोन ओळी अशा होत्या.

"गाजविले गाजविले आझाद रणांगण गाजविले

महिलांनी पुरूषा लाजविले!"

मुंबईत हंसा मेहता, प्रेमा कंटक, सुशीला पै यांनी आणि विदर्भात अकोला येथे प्रमिलाबाई ओक यांनी सत्याग्रहाचे नेतृत्व केले व कारावास आनंदाने स्विकारला. पंडित नेहरू यांच्या मातोश्री स्वरूपराणी नेहरू या मिरवणुकीत अग्रभागी होत्या. त्यांच्याबरोबर पंडित नेहरूंच्या भगिनी विजयालक्ष्मी पंडित आणि पंडितजींच्या पत्नी कमला नेहरू याही होत्या. स्वरूपराणी या लाठीच्या फटक्यामुळे बेशुद्ध पडल्या. विजयालक्ष्मी पंडित आणि कमला नेहरू यांना कारावासाची शिक्षा झाली. कमलादेवी चट्टोपाध्याय, मीनाक्षी साने, हेमप्रभा दास, ज्योतिर्मयी देवी अशा असंख्य महिला सत्याग्रह करून तुरूंगात गेल्या. तुरूंगातील हालअपेष्टा त्यांनी आनंदाने सोसल्या. १९३० च्या आंदोलनात स्त्रिया प्रथम मोठया संख्येने घराबाहेर पडून स्वातंत्र्यलढयात सामील झाल्या. १९३२ साली देशातील सर्व पुढारी व प्रमुख कार्यकर्ते पकडले गेले असतानाही स्वातंत्र्याचा संदेश गावागावापर्यंत नेण्याचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना स्त्रियांनी मोठी साथ दिली. १९३३ मध्ये, कॉग्रेस संघटना बेकायदा असताना, काँग्रसचे अधिवेशन कायदा मोडून घेण्याचे ठरले. कलकत्ता येथे हे अधिवेशन भरले. सरकारने जबर लाठीमार केला, तरीही अधिवेशन काही वेळ चालेले. अध्यक्षस्थानी चितगाव च्या नेली सेनगुप्ता या महिला होत्या. त्यांना अटक करून सहा महिने कारावासाची शिक्षा ठोठवण्यात आली.

म. गांधीच्या लढयाच्या काळातच काही तरूण सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे वळले. यामध्ये काही तरूण विद्यार्थिनीही होत्या. वीणा दास या विद्यार्थिनीने गर्व्हनरवर गोळी झाडली व तिला दहा वर्षाची शिक्षा झाली. चितगाव येथील क्रांतिकारकांच्या गटाने तेथील शस्त्रागार लुटण्याचे ठरविले. या गटात प्रीतिलता दस्तीदार या तरूणीने शासकीय कचेरीवरील हल्लयात भाग घेतला होता. तिने निर्भयपणे हौतात्म्य स्वीकारले. शस्त्रागारलुटीनंतर क्रांतिकारकांची धरपकड झाली. सूर्यसेन फाशी गेला. अनेकांना जन्मठेपेची शिक्षा झाली. यामध्ये कल्पना दत्त या शूर कातिकारी महिलेसही जन्मठेपेची शिक्षा झाली.

सन १९४२ साली 'चले जाव' ठराव ८ ऑगस्टला पास झाला आणि सरकारने म. गांधी व अन्या नेत्यांची धरपकड केली. त्या वेळी कस्तुरबा गांधी निर्भपणे भाषण करण्यास निघाल्या. त्या वेळी त्यांना अटक झाली. कस्तुरबा गांधी तुरूंगात असतानाच त्यांचे निधन झाले.

सन १९४२ सालांत मिरवणुका, मोर्चे याप्रमाणेच भूमिगत चळवळ दीर्घकाळ चालू राहिली. या भूमिगत चळवळीचे नेतृत्व करणाऱ्यांमध्ये अरूणा असफअल्ली या प्रमुख होत्या. जयप्रकाश नारायण, डॉ. लोहिया, अच्युतराव पटवर्धन यांच्यासमवेत अरूणा असफअल्ली यांनी जीवावर उदार होऊन काम केले. १९४२ साली झालेल्या स्वातंत्र्यलढयात हजारो महिला तुरूंगात गेल्या. गुप्त रेडिओ चालविणाऱ्या उषा मेहता, साताऱ्यातील प्रतिसरकारमधील क्रांतिकारकांच्या सहकारी म्हणून धुळयाकडे काम करणाऱ्या लीलाताई पाटील, चिमूरच्या क्रांतिकारकांचे प्राण वाचविण्यासाठी न्यायालयात लढा देणाऱ्या अनुसयाबाई काळे अशा कितीतरी महिलांची कामगिरी सुवर्णअक्षरात वर्णन करावी लागेल.

भारतात स्वातंत्र्यासाठी देशव्यापी चले जाव आंदोलन सुरू असतानाच नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेना स्थापन करून रंगूनमध्ये आझाद हिंद सरकारची स्थापना केली. या आझाद हिंद सेनेत जनरल जगन्नाथराव भोसले, शहानवाज खान, सद्गल, गुरूबक्षसिंग धीलन यांच्या समवेत लक्ष्मी स्वामीनाथन याही होत्या. त्यांच्या नेतृत्वाखाली राणी लक्ष्मी ब्रिगेड स्थापन करण्यात आली. १८५७ साली झांशीच्या राणी लक्ष्मीबाईने स्वातंत्र्यलढयात प्राणार्पण केले आणि स्वातंत्र्य संग्रामाच्या अखेरच्या पर्वात कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन यांनी स्त्रियांची फलटण उभारून स्वातंत्र्यासाठी भारतीय महिला प्राणार्पण करण्यास तयार आहेत हे जगाला दाखविले.

१९४६ साली मुंबई, कलकत्ता आदी ठिकाणी नाविकांचे बंड झाले. नाविकांच्या या उठावात स्त्री पुरूष नागरिक सामील झाले. त्यावेळी झालेल्या गोळीबारात मुंबईत कमल दोंदें या हुतात्मा झाल्या.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैद्राबाद येथील जनतेस निजामापासून मुक्त झाले पाहिजे असे वाटू लागले. हैद्राबादच्या या स्वातंत्र्यलढयात पुरूषांबरोबर अनेक स्त्रियांनी काम केले, आणि अखेर हैद्राबाद भारतात विलीन झाला.

गोव्यातील जनतेने पोर्तुगीज सत्तेपासून मुक्त होण्यासाठी डॉ. लोहिया यांच्यापासून प्रेरणा घेऊन लढा सुरू केला. १९५४ नंतर हा लढा तीव्र झाला. या गोवा मुक्तिसंग्रामात शशी होडारकर, मित्रा काकोडकर, कुमुदिनी पैंगणकर या व अन्य अनेक तरूण मुली होत्या. त्यांना दीर्घ मुदतीच्या सात वर्षांच्या कारावासाच्या शिक्षा झाल्या. सात वर्षांची शिक्षा झाली सुधाताई जोशी या गोमंतक कॉंग्रेसच्या अध्यक्षा झाल्या. त्या गुप्तपणे गोव्यात शिरल्या आणि म्हापसा येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली गोमंतक काँग्रसचे अधिवेशन भरले. या अध्यक्षीय भाषणातून स्वातंत्र्याचा संदेश देत असतानाच पोर्तुगीज पोलिसांनी लाठीहल्ला केला. सुधाताईंना मारहाण झाली, अटक झाली आणि पुढे खटला होऊन त्यांना दहा वर्षांची शिक्षा झाली. गोवा मुक्त झाल्यावर सुधाताईची तुरूंगातून सुटका झाली.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात तन-मन-धन अर्पण करून लढणाऱ्या सर्व शूर स्त्री-स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्यासाठी आत्माहुती दिली. अतुल पराक्रम करीत प्रार्णापण करणाऱ्या स्त्रियांनी इतिहास घडविला. आणि भारताच्या इतिहासात त्या अमर झाल्या.

**संदर्भसूची :**

१. सिंधू शेळके,स्त्री काल-आज-उदया, यशोदा प्रकाशन, अमरावती, एप्रिल १९९६.
२. इरावती कर्वे , हिंदू समाज एक अन्वयार्थ, दि. धो कर्वे प्रकाशन पुणे ऑगस्ट १९७५
३. मासिक, सत्याग्रह विचारधारा, मार्च २०१३
४. मंथली रिव्हयू, फेब्रुवारी -मार्च १९९२ ग्लोबलायझेशन टू व्हॉट एन्ड
५. नवभारत टाइम्स, १ जुलै १९९०